# ॥ बाबा ॥
## पायघडया

सांगावा सांगते आगगाडीच्या कुलुपाला बाबा
तुम्ही यावे आमच्या मुलुखाला, मुलुखाला मुलुखाला ऽऽऽ

उल्हास नदीच्या काठी, वांगणी या गावी, आंबु जंबु चे आहे
दोन बेट आनी, गजाननबाबांच्या सारखी
मिठाई नाही कुट, नाही कुट, नाही कुट, ऽऽऽ

देहाच केलं ताट, डोक्याचा केला नारळ, दोन हातांचा
केला हार, दोन डोळ्यांची केली निरांजन तनमनाची
फुल, वाहिली ग असा केला गजानन बाबांना
पंच आरतीचा थाट, पंच आरतीचा थाट, पंच आरतीचा थाट ऽऽऽ

जात होते वांगनीला, आया बायांना विचारत होते,
गजानन बाबा दिसले का ग, क्रिश्ना साठी राधा वेडी झाली
तशी मी गजानन बाबांच्या साठी
सईरा वईरा धावली, सईरा वईरा धावली, सईरा वईरा धावली, ऽऽऽ

पायांच्या पावल्यांच्या पाय घडया घातल्या गजानन बाबांच्यासाठी
आणी देह झिजला अहोरात्र, गडे गजाननबाबा साठी
गजानन बाबासाठी, गजानन बाबासाठी, गजानन बाबासाठी ऽऽऽ

★★★★★